REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 4 | JANUARY - 2026

# यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीपूरक उद्योगधांद्यामुळेझालेल्या आर्थिक विकासाचे चिकित्सक अध्ययन (कालखंड: सन २०१२-१३ ते सन २०२१-२२)

श्री. दयानंद एन. पुडके
संशोधनकर्ता

डॉ. मारोती बी. राठोड
मार्गदर्शक , शिवरामजी मोघे कला , वाणिज्य व विज्ञान महाविधालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ.

## सारांश

ज्ञानाचा शिस्तबद्ध व नियोजित पद्धतीने शोध घेण्याच्या प्रक्रियेस सामान्यतः संशोधन असे संबोधले जाते. संशोधनाची आणखी एक मांडणी अशी करता येईल की, एखाद्या ठरावीक विषयाशी संबंधित तथ्यांचा शास्त्रीय व पद्धतशीर शोध म्हणजे संशोधन होय. प्रत्यक्षात संशोधन ही एक अशी कला आहे, ज्यामध्ये वैज्ञानिक चौकशीचा समावेश असतो. ॲडव्हान्स्ड लर्नर्स डिक्शनरी ऑफ करंट इंग्लिशनुसार संशोधन म्हणजे "ज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रातील नवीन तथ्यांचा शोध घेण्यासाठी केलेली काळजीपूर्वक तपासणी अथवा अभ्यास". रेडमन आणि मोरी (१९३३) यांच्या मते, "नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केलेला नियोजित व शिस्तबद्ध प्रयत्न म्हणजे संशोधन होय".



काही अभ्यासक संशोधनाची व्याख्या ज्ञात अवस्थेतून अज्ञात दिशेने होणारी बौद्धिक वाटचाल अशी करतात. प्रत्यक्षात हा एक सतत सुरू राहणारा शोधप्रवास आहे.

मानवी स्वभावामध्ये कुतूहल हा एक मूलभूत गुणधर्म अंतर्भूत आहे. अपरिचित गोष्टींचा सामना करताना माणसाला आश्चर्य वाटते आणि त्या गोष्टी अधिक सखोलपणे समजून घेण्याची जिज्ञासा निर्माण होते. अज्ञात गोष्टींबाबत जाणून घेण्यासाठी मनुष्य ज्या विविध पद्धतींचा अवलंब करतो, त्या सर्व प्रक्रियांना संशोधन असे म्हणता येते. हीच जिज्ञासा सर्व ज्ञानाचा मूलस्रोत मानली जाते.

या प्रकरणामध्ये अभ्यासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अवलंबिलेल्या विविध धोरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. त्यामध्ये समस्या विधान, संशोधन रचना, संशोधनाचे विश्व व नमुना, माहिती संकलनाच्या पद्धती, माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्णयन तसेच अभ्यासासाठी वापरण्यात आलेल्या सांख्यिकीय तंत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

## प्रस्तावना

भारताच्या सामाजिक आणि आर्थिक संरचनेत शेतीचा अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे, विशेषतः महाराष्ट्रातील विदर्भ विभागात येणाऱ्या यवतमाळसारख्या ग्रामीण जिल्ह्यांत. प्रामुख्याने कृषीप्रधान असलेला यवतमाळ जिल्हा दीर्घकाळापासून पारंपरिक पिकांच्या लागवडीवर आधारित उपजीविकेवर अवलंबून आहे. मात्र, गेल्या काही दशकांत वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनी, मान्सूनच्या अनिश्चित पावसावर अवलंबून राहण्यामुळे, कमी पीक उत्पादनामुळे, शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठांचा वाढता खर्च, पिकांचे अपयश व पुरेशा बाजारपेठेचा अभाव यांमुळे जिल्ह्यात गंभीर शेतीसंकट निर्माण झाले आहे. या संकटाचा प्रभाव विशेषतः लहान आणि अल्पभूधारक शेतकरी तसेच ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांच्याआर्थिक स्थिरतेवर मोठ्या प्रमाणात पडला आहे.

या प्रतिकूल परिस्थितीचा सामना करताना, यवतमाळ जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी उत्पन्नाचे पर्यायी व पूरक मार्ग म्हणून संलग्न कृषी व्यवसायांकडे वळण्यास सुरुवात केली आहे. कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालन हे उद्योग आता

उपजीविकेच्या महत्त्वाच्या माध्यमांपैकी एक बनले आहेत. हे व्यवसाय उत्पन्न वाढवण्यासाठी, हंगामी शेतीवरील अवलंबन कमी करण्यासाठी, अन्न आणि पोषण सुरक्षेची खात्री देण्यासाठी, तसेच ग्रामीण भागात रोजगार निर्माण करण्यासाठी प्रभावी ठरत आहेत.

उदाहरणार्थ, कुक्कुटपालन हा कमी भांडवली गुंतवणूक आणि कमी कालावधीत अधिक परतावा देणारा लाभदायक व्यवसाय ठरला आहे. अंडी आणि कोंबडीच्या मांसाची वाढती मागणी ग्रामीण व शहरी बाजारपेठांमध्ये त्याला चालना देते. शेळीपालनासाठी कमी देखभाल खर्च, प्रतिकूल हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता आणि जलद पुनरुत्पादन ही वैशिष्ट्ये असून, संसाधनांच्या अभावातही हा व्यवसाय सहज शक्य असल्यामुळे तो गरीब शेतकऱ्यांसाठी विशेष उपयुक्त आहे. दुग्धव्यवसाय हा दैनंदिन उत्पन्न देणारा व्यवसाय असल्याने शेतकरी कुटुंबांना आर्थिक स्थैर्य आणि पोषणदृष्ट्या फायदे देतो. त्याचप्रमाणे, मत्स्यपालन हा तुलनेने कमी प्रमाणात आढळणारा व्यवसाय असला तरी ज्या भागांमध्ये जलसाठे उपलब्ध आहेत, तेथे तो प्रथिनांचा आणि पूरक उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत ठरू शकतो.

सन २०१२ ते २०२२ या दशकात यवतमाळ जिल्ह्यात या पूरक व्यवसायांचा विकास झाल्याचे आढळून आले आहे. केंद्र आणि राज्य सरकारांच्या विविध योजनांद्वारे, आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण कार्यक्रम, पशुधन विकास योजना आणि ग्रामीण विकास मोहिमा यांसारख्या उपक्रमांद्वारे या व्यवसायांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मात्र, संसाधनांचा असमतोल, बाजारपेठेची मर्यादित पोहोच, तांत्रिक ज्ञानाचा अभाव आणि संस्थात्मक पाठिंब्याची कमतरता यामुळे या उपक्रमांचे यश आणि शाश्वतता वेगवेगळया भागांमध्ये आणि शेतकरी वर्गांमध्ये भिन्न राहिली आहे.

या संशोधनाचा उद्देश, २०१२ ते २०२२ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यात पूरक कृषी व्यवसायांनी कशाप्रकारे आर्थिक परिस्थितीवर परिणाम केला, याचे सखोल विश्लेषण करणे आहे. या व्यवसायांनी शेतकरी समुदायांच्या आर्थिक सक्षमीकरणात काय भूमिका बजावली, वेगवेगळ्या सामाजिक-आर्थिक गटांनी त्याचा स्वीकार कसा केला, नफा वाढीसाठी कोणते घटक महत्त्वाचे ठरले, आणि कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले याचा अध्ययन केला जाणार आहे. यासोबतच, या क्षेत्रातील उत्कृष्ट अनुभव व अडथळे ओळखणे, धोरणात्मक उपाययोजनांचा प्रभाव तपासणे, आणि या उपक्रमांमुळे झालेल्या सामाजिक-आर्थिक परिणामांचे मूल्यांकन करणे हे देखील संशोधनाचे उद्दिष्ट राहील.

संख्यात्मक विश्लेषण, क्षेत्रीय सर्वेक्षण व संबंधित भागधारकांच्या मुलाखती यांच्या माध्यमातून, हा अध्ययन यवतमाळ जिल्ह्याच्या संदर्भात कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालन या व्यवसायांची आर्थिक व्यवहार्यता, रोजगारनिर्मितीची क्षमता आणि विस्तारयोग्यता यावर प्रकाश टाकतो. या संशोधनाचे निष्कर्ष धोरणकर्ते, विकास संस्था, कृषी विस्तार अधिकारी आणि शेतकरी संघटनांना सुचवलेले उपाय व उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक ठरतील.

एकंदरीत, यवतमाळ जिल्ह्यासारख्या जोखमीच्या शेती क्षेत्रात पूरक व्यवसायांचे एकत्रीकरण हा ग्रामीण विकासाचा शाश्वत मार्ग ठरू शकतो, असे या अध्ययनात मानले आहे. या दशकातील अध्ययनाच्या आधारावर, महाराष्ट्रासह भारतातील अन्य कृषी-अवलंबित व हवामानदृष्ट्या संवेदनशील भागांमध्ये कृषी विविधता, ग्रामीण उत्पन्न वाढ आणि शेतकऱ्यांच्या लवचिकतेच्या मुद्द्यांवर विचारमंथनाला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**सारणी क्रमांक १ : प्रक्रिया उद्योग सुरू करणे फायदेशीर आहे असे वाटण्यासंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया**

| **प्रतिक्रिया** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ४४९ | ६५७. |
| नाही | १३६ | १९९. |
| खात्री नाही | ९८ | १४३. |
| **एकूण** | **६८३** | **१०००.** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **मूल्यP** |
| ३२५ ९३७. | २ | ०.०५> |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये प्रक्रिया उद्योग सुरू करणे फायदेशीर आहे असे वाटण्यासंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील ६५.७% शेतकऱ्यांना

प्रक्रिया उद्योग सुरू करणे फायदेशीर आहे असे वाटत असून १९.९% शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योग सुरू करणे फायदेशीर आहे असे वाटत नाही. त्याचप्रमाणे १४.३% शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योग सुरू करणे फायदेशीर असण्यासंबंधी खात्री नाही.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतकऱ्यांची प्रक्रिया उद्योग सुरू करणे फायदेशीर आहे असे वाटण्यानुसार तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = ३२५.९३७; स्वातंत्र्यांश = २ ; P मूल्य <०.०५) अंतर आहे. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योग सुरू करणे फायदेशीर आहे असे वाटते.

**सारणी क्रमांक २ : कृषी उद्योगात गुंतवणूक करण्यास तयार आहात का? या विधानासंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया**

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३७४ | ५४८. |
| नाही | ३०९ | ४५२. |
| **एकूण** | **६८३** | **१०००.** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **मूल्यP** |
| ६ १८६. | १ | ०.०५> |

उपरोक्त सारणी क्रमांक ४.३९ मध्ये कृषी उद्योगात गुंतवणूक करण्यास तयार आहात का? या विधानासंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील ५४.८% शेतकरी कृषी उद्योगात गुंतवणूककरण्यास तयार असून ४५.२% शेतकरी कृषी उद्योगात गुंतवणूक करण्यास तयार नाहीत.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतकऱ्यांची कृषी उद्योगात गुंतवणूक करण्यास तयार आहात का? या विधानानुसार तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = ६.१८६; स्वातंत्र्यांश = १ ; P मूल्य <०.०५) अंतर आहे. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी कृषी उद्योगात गुंतवणूक करण्यास तयार आहेत.

## निष्कर्ष

यवतमाळ जिल्ह्यातील शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या बहुतांश शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योग सुरू करणे फायदेशीर आहे असे वाटते. बहुतांश शेतकरी कृषी उद्योगात गुंतवणूक करण्यास तयार आहेत. बहुतांश शेतकरी भांडवलाच्या अभावामुळे कृषी उद्योगात गुंतवणूक करण्यास तयार नाहीत. बहुतांश शेतकरी शेतकऱ्यांचा कृषी औद्योगिक उपक्रमांमध्ये जास्त रस आहे. बहुतांश शेतकऱ्यांना कृषी प्रक्रिया प्रशिक्षण मिळाले नाही. यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्रातून (KVK) कृषी प्रक्रिया प्रशिक्षण घेतले आहे. बहुतांश शेतकऱ्यांना कृषी-औद्योगिक उपक्रमांसाठी प्रशिक्षण घ्यायचे आहे. बहुतेक शेतकऱ्यांना कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याऐवजी त्याची थेट विक्री करणे अधिक योग्य वाटते. बहुतांश शेतकऱ्यांना कृषी-उद्योग त्यांचे मध्यस्थांवरचे अवलंबित्व कमी करू शकतात असे वाटते. बहुतांश शेतकऱ्यांना पूरक कृषी-उद्योग ग्रामीण बेरोजगारी कमी करू शकतात असे वाटते. बहुतांश शेतकऱ्यांना कृषी उद्योग शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करण्यास मदत करतात असे वाटते. बहुतांश शेतकऱ्यांना नफ्यामुळे कृषी उद्योग सुरु करण्यासाठी प्रेरणा मिळाली आहे.

## संदर्भ:

1) National Bank for Agriculture and Rural Development. (2019). Yavatmal PLP 2019–20. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/1710180954Yavatmal%20PLP%202019-20.pdf
2) National Bank for Agriculture and Rural Development. (2020). PLP 2020–21: Yavatmal District. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/2910195259YAVATMAL%20PLP-2020-21%20-%20Last.pdf

3) Department of Animal Husbandry & Dairying, Government of India. (2024). Annual Report 2023–24. https://dahd.gov.in/sites/default/files/2024-10/AnnualReport202324.pdf
4) National Institution for Transforming India (NITI Aayog). (2021). Agriculture, Animal Husbandry and Fisheries Sector Report. https://dmeo.gov.in/sites/default/files/2021-07/1_Sector_Report_Agriculture_Animal_Husbandry_and_Fisheries_FINAL.pdf
5) Directorate of Economics and Statistics. (2024). Economic Survey of Maharashtra 2023–24. https://mahades.maharashtra.gov.in/ESM1920/chapter/English/esm2324_e.pdf
6) Press Information Bureau, Government of India. (2025, January 31). India's agriculture sector demonstrates resilience, average growth rate of 5% during FY17 to FY23: Economic Survey. https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2097886
7) Sujatha, R. N. (2019). Nature and scope of allied activities in agriculture. International Journal of Research and Analytical Reviews, 6(1), 273–276. https://ijrar.org/papers/IJRAR19J5699.pdf
8) OpenEdition Books. (2002). The national legacy in India: Evolution of agricultural policy since the sixties. In D. Mazumdar (Ed.), Evolution of Agricultural Policy since the Sixties (pp. 21–43). https://books.openedition.org/editionsmsh/7542?lang=en
9) Integrated Crop-Livestock Farming. (2023). Complementary crop-livestock farming: A practice for sustainability in the Mediterranean. International Union for Conservation of Nature. https://iucn.org/sites/default/files/2023-05/practice_j.-complementary-crop-livestock-farming_final.pdf
10) Down to Earth. (2024, November 7). Farmers in Maharashtra are adopting integrated farming practices for better profits. https://www.downtoearth.org.in/agriculture/farmers-in-maharashtra-are-adopting-integrated-farming-practices-for-better-profits
11) Swayam Shikshan Prayog. (2018, February 4). How crop diversification helped marginal farmers in Maharashtra's Solapur. Scroll.in. https://scroll.in/article/867303/how-crop-diversification-helped-marginal-farmers-in-maharashtras-solapur-turn-their-lives-around
12) The Financial Express. (2019, November 11). Doubling farm income: Maharashtra farmers find winning combo in fish and paddy. https://www.financialexpress.com/policy/economy-doubling-farm-income-maharashtra-farmers-find-winning-combo-in-growing-fish-with-paddy-1760686/
13) Department of Animal Husbandry & Dairying, Government of India. (2023). Annual Report 2022–23. https://dahd.gov.in/sites/default/files/2023-06/FINALREPORT2023ENGLISH.pdf
14) National Bank for Agriculture and Rural Development. (2018). Final Report on Doubling Farmers' Income: Issues and Strategies—Maharashtra State. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/2304191830Final%20Report_Doubling%20of%20Farmers'%20Income_Maharashtra%20State_Oct%202018.pdf
15) Department of Economics & Statistics, Government of Maharashtra. (2024). Final Report—Government of Maharashtra. https://mahades.maharashtra.gov.in/files/report/SIES_RSS_Volume_3.pdf
16) Food and Agriculture Organization. (2000). Complementarity in resource use and potential positive environmental impacts. http://www.fao.org/4/x6108e/x6108e05.htm
17) Agricorn. (2023, March). Allied enterprises and their importance. https://www.agricorn.in/2023/03/allied-enterprises-and-their-importance.html